# जिल्हाधिकारी, तथा जिल्हा निवडणुक अधिकारी कार्यालय, औरंगाबाद,

मध्यवर्ती प्रशासकीय इमारत फाजलपुरा औरंगाबाद

दुरध्वनी क्र. 0240-2331211/ Fax No. 0240-2338394, email id - ecpcellhq@gmail.com


जा.क्र.जिकअ/नि.खर्च नि.कक्ष/2019/184 दिनांक :- 21/04/2019

## नोटीस

प्रति,

**श्री सुभाष किशनराव पाटील**
प्लॉट नं.3, सुनेम रेसीडेन्सी,रचनाकर कॉलनी,
रेल्वस्टेशन रोड,औरंगाबाद

**विषय :- 19-औरंगाबाद लोकसभा सर्वसाधारण निवडणूक 2019**
मा. निवडणूक खर्च निरीक्षकामार्फत निवडणूक लढविणाऱ्या उमदेवारांचा दैनंदिन खर्च लेखा तपासणी बाबत.

संदर्भ :- 1. निवडणूक खर्चाचे नियंत्रण करण्यासाठीचे सारसंग्रह माहे फेब्रुवारी 2019
2. Conduct of Election Rule 1961 मधील नियम 87
3. या कार्यालयाचे पत्र क्र.146 दिनांक 09.04.2019 ( तपासणी वेळापत्रक)

वरील संदर्भीय विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमदेवारांनी लोकप्रतिनिधी अधिनियम 1951 चे कलम 77 नुसार निवडणूकीतील प्रत्येक उमेदवारास नामनिर्देशन दाखल केल्याच्या दिनांकापासुन ते निवडणूकीचा निकाल जाहीर झाल्याचा दिनांक हे दोन्ही दिवस धरुन होणाऱ्या कालावधीच्या दरम्यान निवडणूकीच्या संबंधात उमेदवारास किंवा उमेदवाराच्या प्रतिनिधीला सर्व खर्चाचा स्वतंत्र व यथातथ्य हिशोब ठेवणे आवश्यक आहे.

तसेच निवडणूक खर्चाचे नियंत्रण करण्यासाठीचे सारसंग्रह माहे फेब्रुवारी 2019 व Conduct of Election Rule 1961 मधील नियम 87 नुसार निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी मतदान होई पर्यंतच्या कालावधी पर्यंत दैनंदिन खर्चाचा लेखा तीन वेळा मा.निवडणूक खर्च निरीक्षकाकडुन तपासणी करुन घेणे आवश्यक आहे तथापि संदर्भ क्र.3 अन्वये आपणास दैनंदिन लेखा तपासणीसाठी वेळापत्रकासह सूचित करुनही आपण दिनांक 21.04.2019 रोजीच्या तपासणीच्यावेळी आपण मा.निवडणूक खर्च निरीक्षकास दैनंदिन खर्चाचा लेखा तपासणीच्या वेळी सादर केलेला नाही व तपासणीसाठी आपण किंवा आपले प्रतिनिधी हजर राहिले नाहीत. सदर बाब Conduct of Election Rule 1961 मधील नियम 87 भंग करणारी आहे. तरी आपणा विरुध्द भा.दं.वि. 1980 चे कलम 171 (I) नूसार मा.सक्षम न्यायालयात तक्रार दाखल करण्याची कार्यवाही का करण्यात येवू नये? याचा खुलासा 48 तासाच्या आत सादर करावा अन्यथा आपणा विरुध्द उपरोक्त कलमानुसार पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**निवडणूक निर्णय अधिकारी**
19-औरंगाबाद लोकसभा मतदार संघ

प्रत :-

1. जिल्हा माहिती अधिकारी यांना देवून कळविण्यात येते की, सदरील नोटीसीची व्यापक प्रसिध्दी स्थानिक वर्तमान पत्रात देण्यात यावी.
2. जिल्हा समन्वयक, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र (NIC) औरंगाबाद यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.
3. सुचनाफलक.

Scanned by CamScanner